<table>
<tr><td>MHAU110002452018</td><td><u>नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१८ मधील</u><br><u>निशाणी क्र. ४१ वरील आदेश</u><br>(शामराव जाधव वि. रामभाऊ जाधव)</td></tr>
</table>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० आणि आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादी यांच्या कथनाप्रमाणे, त्यांनी हकज्ञापणाकरीता दावा दाखल केलेला आहे. दावा दाखल करतांना गडबडीमध्ये गट नं.१७१५ असा परिच्छेद क्र.४ मध्ये नमुद करण्यात आला आहे. पण त्याऐवजी दावा मिळकत सिटीएस नं.१३६५ नमुद करणे गरजेचे होते. सदरची चुकी अनवधानाने झालेली आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. म्हणुन वादी यांना परिच्छेद क्र.३ व ४ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी नि. वर आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे, प्रस्तुतचा दावा अंतीम युक्तीवादाकरीता ठेवण्यात आलेला आहे. वादी यांचा पुरावा दि.०८.०७.२०२४ रोजी बंद केलेला आहे. प्रतिवादी क्र.०३.१०.२०१४ रोजी पुरावा बंद केलेला आहे. सदरचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नाही. सदरचा अर्ज मंजुर करायचा झाल्यास सदरचा अर्ज द्रव्य दंड रक्कम रुपये ५०००/– सह नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागत असलेली दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

५. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u> –**

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता, वादी यांनी प्रस्तुतचा हकज्ञापणासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकती संदर्भात संपुर्ण माहिती अभिलेखावर येणे क्रमप्राप्त आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा दाखल करतांना टाईपींगच्या चुकीमुळे गट नं.१७१५ नमुद करण्यात आला आहे. सदरची बाब आताच त्यांच्या लक्षात

आल्यानंतर त्यांनी त्या ऐवजी सिटीएस नं.१३६५ नमुद करण्याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता मालमत्ता क्र.१७१५ दिसुन येत नाही, त्या ऐवजी १७७५ सी.स.क्र.१३६५ दिसुन येतो. त्यामुळे खरी वस्तुस्थिती अभिलेखावर येणे गरजेचे आहे. दाव्याचे स्वरूप पाहता वादी मागत असलेली दुरूस्ती न्यायनिर्णयाकरिता महत्वाची आहे. सदरची दुरुस्ती केल्याने निश्चितपणे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सदरची दुरूस्ती मंजुर केलेस प्रतिवादी यांना जादा कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या दुरुस्तीने प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होत नाही.

७. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता, वादी मागत असलेली दुरुस्ती न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर मागितली आहे. परंतू सध्या त्यांना समजले असल्याचे दिसून येते. त्याचा अर्थ वादी याने दावा दाखल करत्यावेळी याची जाणिव होती, परंतू सदरचा दावा गुणदोषावर चालविण्याच्या दृष्टीने व दोन्ही बाजूंना योग्य ती संधी देण्याच्या उददेशाने जरी विलंब झाला असला तरी सदरचा अर्ज द्रव्य दंडावर मंजुर करणे योग्य वाटते. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांना द्रव्यदंड म्हणुन रक्कम रू.५००/– देणे क्रमप्राप्त व योग्य वाटते. तसेच सदरची केस जुनी असल्यामूळे वादी याने विलंब न करता पुढील स्टेप्स घ्याव्यात. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

३. वादी यांनी प्रतिवादी यांना द्रव्यदंड म्हणुन र.रू.५००/– द्यावेत.

४. वादी यांनी द्रव्यदंडाची पुर्तता पुढील तारखेला करावी व सदरची केस लवकरात लवकर चालवावी.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2025.12.17 17:29:09 +0530

**फुलंब्री**
**दिनांक : १७/१२/२०२५**

**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फुलंब्री**